भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2016-17/207
डीसीएम(पीएलजी)क्र.2200/10.27.00/2016-17 जानेवारी 03, 2017

अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी,
(धनकोष असलेल्या सर्व बँका)

महोदय/महोदया

ग्रामीण क्षेत्रांसाठी रोख रकमेचे वाटप

कृपया, ग्रामीण क्षेत्रांना रोख रक्कम उपलब्ध करण्यावरील आमची परिपत्रके डीसीएम(पीएलजी)क्र.1345/10.27.00/2016-17 दि. नोव्हेंबर 22, 2016 आणि डीसीएम(पीएलजी)क्र.1508/10.27.00/2016-17 दि. डिसेंबर 2, 2016 चा संदर्भ घ्यावा.

2. ग्रामीण क्षेत्रांच्या लोकसंख्येच्या आवश्यकतांनुसार सध्या त्यांना बँक नोटा पुरविल्या जात नसल्याचे नजरेस आल्यावर, वरील परिपत्रकात दिल्यानुसार त्यासाठीची पाऊले उचलली गेली आहेत. बँक नोटांच्या किमान 40% नोटा ग्रामीण क्षेत्रांना पुरविल्या जात असल्याची खात्री करुन घेण्यासाठी आणि हा प्रश्न अधिक टिकणा-या रीतीने कमी करण्यासाठी, वरील उपाय सुरु असतानाच पुढील उपाय योजण्यास धनकोष ठेवणा-या बँकांना सांगण्यात येत आहे.

**वितरण वाहिन्या आणि चलन प्रवाहाचे प्रमाण**

(1) आरआरबी, डीसीसीबी व वाणिज्य बँकांच्या ग्रामीण क्षेत्रातील बँक शाखांना, ग्रामीण क्षेत्रातील व्हाईट लेबल एटीएमना तसेच ग्रामीण क्षेत्रातील पोस्ट ऑफिसांना अधिक संख्येत नव्या नोटा पुरविण्यास बँकांनी त्यांच्या धनकोषांना सांगावे. कारण ह्या सर्व, ग्रामीण क्षेत्रातील प्रमुख वाहिन्या आहेत.

(2) सीएएसए मधील ठेवी व ठेव खात्यांची संख्या ह्यांच्या संबंधाने, प्रत्येक जिल्ह्यामधील, ग्रामीण व नागरी लोकांच्या मिश्रणामध्ये असलेल्या फरकावर अवलंबून, जिल्ह्या-जिल्ह्यातील ग्रामीण आवश्यकता बदलू शकत असल्याने, ह्याबाबतीत गरज आधारित दृष्टिकोन ठेवण्यास मदत होण्यासाठी, जोडपत्र 1 अनुसार, तेथील ग्रामीण व नागरी मिश्रणावर अवलंबून प्रत्येक जिल्ह्यासाठी, वाटप करण्याची विशिष्ट टक्केवारी देण्यात आली आहे.

(3) त्यानुसार, एखाद्या जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सर्व धनकोषांनी, निर्देशित केलेल्या प्रमाणात वर निर्देश केलेल्या वितरण वाहिन्यांना बँक नोटा दिल्याच पाहिजेत. दैनिक धर्तीवर हे प्रमाण ठेवले जाणे अवघड असल्याने, प्रत्येक धनकोष स्तरावर, निर्देशित केलेले प्रमाण साप्ताहिक सरासरी धर्तीवर ठेवले जावे.

**देखरेखी साठीचा अहवाल**

(4) प्रत्येक शुक्रवारी व्यवहार संपल्यानंतर, धनकोषांनी, साप्ताहिक सारांश असलेल्या चेस्ट स्लिप्ससह, वरील वर्गांना देण्यात आलेली दैनिक रक्कम/नोटांची माहिती, त्यांच्या लिंक ऑफिसांना (एलओ) देणे अत्यावशक आहे आणि ह्या एलओंनी ही माहिती, संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे (अहवालाचा नमुना जोडला आहे) पुनरावलोकनासाठी पाठवावी. हे चेस्ट बॅलन्सेस रिपोर्टिंग यंत्रणेसारखेच (जोडपत्र 2) असू शकते. एकगठ्ठा पाठविणे टाळण्यासाठी आणि असे अहवाल समानतेने असण्याची खात्री करण्यासाठी, एलओंनी दैनंदिन अहवालांवर देखरेख ठेवावी.

**मूल्यात्मक मिश्रण**

(5) धनकोषांनी रु.500/- व त्याखालील मूल्यांच्या बँक नोटा द्याव्यात. डब्ल्युएलओसह विशिष्ट एटीएम्स ह्यांना, रु.500/- व रु.100/- च्या नोटा द्याव्यात. एटीएम वर्गामध्ये, ऑन-साईट एटीएम्सच्या तुलनेत, ऑफसाईट एटीएम्सना अधिक प्रमाणात रोकड दिली जावी. कारण ती एटीएम्स, लास्ट-माईल चलन जोडणी मध्ये अधिक महत्वाची आहेत.

(6) रु.100/- पेक्षा कमी अशा इतर मूल्यांच्या नोटांचा साठा मोठ्या प्रमाणावर दिला जावा.

(7) बँकांची नाण्यांसाठी आवेदनपत्र द्यावीत. तसेच आवश्यक असल्यास भारतीय रिझर्व बँकेकडून पुरवठा मिळवावा आणि प्राधान्य क्रमाने जनतेला पुरवठा होत असल्याची खात्री करुन ध्यावी.

(3) कृपया पोच द्यावी.

आपली विश्वासु,

(पी विजया कुमार)
मुख्य महाव्यवस्थापक

सोबत - वरीलप्रमाणे.

सोबत जोडपत्र 1

**जोडपत्र 2**

**<u>लिंक ऑफिसेसकडून आरबीआयच्या आरओंना पाठवावयाचा दैनिक अहवाल</u>**

(रु. कोटी)

| बँक | तारीख | ग्रामीण एटीएम्सना वितरित केलेली रोख रक्कम | -- च्या ग्रामीण शाखांना वितरित केलेली रोकड | | | ग्रामीण डब्ल्युएलए ला दिलेली रोख रक्कम | ग्रामीण क्षेत्रातील पोस्ट ऑफिसांना दिलेली रोख रक्कम | ग्रामीण क्षेत्रांना दिलेली एकूण रोख रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **आरआरबी** | **वाणिज्य बँका** | **डीसीसीबी** | | | |
| | | | | | | | | |